# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- ६५-२३** **दिनांक :- २७/०२/२०२३**

## मिरा-भाईंदर महानगरपालिका "कला क्रिडा महोत्सव" २०२२-२०२३ च्या अंतिम सामन्यात मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील क्रिकेट संघ ठरला विजयी.

मिरा-भाईदर महानगरपालिका क्रिडा विभागामार्फत दिनांक २६/०२/२०२३ ते दिनांक २७/०२/२०२३ रोजी पावेतो नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान, भाईंदर (प.) येथे "कला क्रिडा महोत्सव" २०२२-२०२३ चे अनुषंगाने टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवामध्ये मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व अंमलदार याचे संघाने सहभाग घेतला होता. सदर संघाचे नेतृत्व श्री. विनायक नरळे, सहायक पोलीस आयुक्त, मुख्यालय यांनी केले. महोत्सवामध्ये पोलीस, महानगरपालिका, अग्निशमन दल, अरोग्य विभाग, वन विभाग अशा एकुण १८ संघाचा सहभाग होता.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील संघाने क्रिकेट स्पर्धे दरम्यान ३ संघाचा पराभव करुन अंतिम सामन्यात प्रवेश केला होता. अंतिम सामन्यात मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वॉर्ड नं. ४ च्या संघाने दिलेले ३६ बॉलमध्ये ५८ धावांचे लक्ष पोलीस आयुक्तालयातील संघाने पुर्ण करुन विजय मिळविला. मिळालेल्या विजयाबद्दल मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि. व श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त यांनी पोलीस आयुक्तालयातील क्रिकेट संघास शुभेच्छा दिल्या आहेत.

सदर क्रिकेट संघामध्ये श्री. विनायक नरळे, सहायक पोलीस आयुक्त, मुख्यालय, पो.नि. कुमारगौरव धादवड, राहुल राख, स.पो.नि. सतीश निकम, शैलेन्द्र पाटील, पो.उप.नि. किशोर धायगुडे, स्वनील बेलोसे, राम कदम, पो.हवा गणेश कदम, अनिल शिरसाट, प्रशांत सोनावणे, अतुल गोसावी, गजानन सुरोशी, निलेश शेळके, स्वप्नील पशिलकर, गाडेकर, पो.अंम. विलास सोमवंशी, विक्रम गडवे, किरण विरकर याचा सहभाग होता.



-----ooo-----